Initial Environmental Examination (Sindhudurg)

सारांशः–

महाराष्ट्र तृतीयक आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण क्षेत्र विकास कार्यक्रम (MTCMESDP) चा उद्देश राज्यातील तृतीयक आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षणाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.
सदर प्रकल्पांतर्गत अलिबाग, सिंधुदुर्ग, अमरावती व वाशीम या जिल्ह्यांमध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये उभारली जाणार आहेत.

गंभीर पर्यावरणीय परिणाम अपेक्षित नसल्याने **सिंधुदुर्ग येथे ५०० खाटांचे रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय** उभारण्याचा उप- प्रकल्प आशियाई विकास बँकेच्या पर्यावरणीय निकषांनुसार Category-B मध्ये मोडतो

सदर उप- प्रकल्पात भारत सरकारच्या पर्यावरण, जैववैद्यकीय कचरा, धोकादायक कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण आणि कामगार संरक्षणासंबंधी नियमांचे पालन करण्यात येणार आहे.

प्रकल्पाचे बांधकाम क्षेत्र २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्याने आवश्यक **पर्यावरण मंजुरी (EC)** प्राप्त करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग यासाठी जबाबदार होता. या प्रकल्पासाठी वन, वन्यजीव, सीआरझेड किंवा पुरातत्त्व विभागाची मंजुरी आवश्यक नाही. मात्र इतर ना- हरकत प्रमाणपत्रे (पर्यावरण मंजुरी (Environmental Clearance), प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी, अग्निशमन ना-हरकत इत्यादी) घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावित प्रकल्पामध्ये ५०० खाटांचे रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, मुला-मुलींसाठी वसतिगृहे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, रक्तपेढी, ICU, OPD, पार्किंग, शवागार, लॉन्ड्री, STP/ETP यंत्रणा आदी सुविधा असतील.

प्रकल्पाचे ठिकाण रणबांबुळी गाव, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथे आहे. परिसरात कोणतेही पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र, जंगल किंवा संरक्षित क्षेत्र नाही. जवळचे राखीव जंगल सुमारे १.३ किमी अंतरावर आहे.

बांधकाम व संचालन काळात वाहतूक, जैववैद्यकीय कचरा, सांडपाणी, घनकचरा आणि वाढत्या वाहतुकीमुळे काही पर्यावरणीय परिणाम होऊ शकतात. त्यासाठी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) राबविण्यात येणार आहे. EMP अंतर्गत पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी उपाययोजना, जबाबदाऱ्या आणि निरीक्षण व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पही प्रस्तावित आहे.

पर्यावरणीय सुरक्षेसाठी Environmental and Social Safeguard Cell (ESSC) आणि Facility Level Environmental Unit स्थापन करण्यात येतील. सिंधुदुर्ग वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता या युनिटचे प्रमुख असतील.

आशियाई विकास बँकेच्या धोरणानुसार प्रकल्पाच्या सर्व टप्प्यांमध्ये स्थानिक नागरिक व इतर हितधारकांशी सल्लामसलत करण्यात आली असून ती पुढेही सुरू राहील. पर्यावरण, सामाजिक बाबी आणि कामगार सुरक्षा संदर्भातील तक्रारींसाठी तक्रार निवारण यंत्रणा **(GRM)** स्थापन केली जाईल. ती पारदर्शक, सुलभ आणि लोकाभिमुख असेल.

हा प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यात आधुनिक, परवडणारी आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा तसेच उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून पर्यावरणीय परिणाम कमी ठेवण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येणार आहेत.